पोलीस निरीक्षक मंचर पोलीस ठाणे

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** मंचर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0084 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**28/03/2026 02:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिंनाक पासून):** 27/03/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 27/03/2026

**Time From (वेळेपासून):** 15:03 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 28/03/2026 **Time (वेळ):** 02:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 28/03/2026 02:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उपविभागीय अधिकारी, जुन्नर -आंब, आंबेगाव उपविभाग, मंचर, या ,कार्यालयात ता आंबेगाव जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रसाद माणिक लोणारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,मंचर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,मंचर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9923444998

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. गोविंद पंढरीनाथ शिंदे | | | 1. कुबेर पलेस, फलट नं 403, बेड,मळा, मंचर, जि पुणे , मंचर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
मी प्रसाद माणिक लोणारे, वय-52, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9923444998

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 24/03/2026 रोजी 14.30 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री. सचिन उत्तमचंद शेलोत वय-46 वर्षे धंदा- बांधकाम व्यवसाय, रा.सुरज बंगला, कवडे हॉस्पीटल शेजारी, नारायणगाव, ता.जुन्नर जि.पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता वस्तु व सेवा कर विभाग, येरवडा पुणे या विभागाचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. त्यादरम्यान 15.30 वा चे सुमारास दोन पंच हजर झाले. दोन्ही पंच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर झाल्यानंतर आम्ही नमुद पंच यांना आमची ओळख करुन देऊन तक्रारदार व पंचांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली. नमुद पंच यांना तक्रारदार श्री. सचिन उत्तमचंद शेलोत यांची लोकसेवकाविरुध्द तक्रार असुन आपण सदर कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात का? असे विचारले असता दोन्ही पंचानी कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास होकार दिला. नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री. अमोल कृष्णा अंदुरे पद- राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, येरवडा पुणे हे व पंच क्रं 2 श्री.यशपाल चंद्रकांत कांबळे पद- राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, येरवडा, पुणे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार सचिन शेलोत यांनी आमचे सुचनेवरुन त्यांची तक्रार कथन केली ती खालीलप्रमाणे.

"मी सचिन उत्तमचंद शेलोत वय-46 व्यवसाय- बांधकाम व्यवसाय, रा. सुरज बंगला, कवडे हॉस्पीटल शेजारी, नारायणगाव ता.जुन्नर जि.पुणे असा असुन मी मागील दहा वर्षापासुन बांधकाम व्यवसाय करीत आहे. मी आर्शिवाद इन्फास्ट्रक्चर नावाच्या फर्मचे सर्व कामकाज पहात असुन ते कामकाज करण्याबाबतचे अधिकार कुलमुख्यत्यारपत्र आर्शिवाद इन्फास्ट्रक्चर यांनी मला दिलेले आहे. त्यानुसार मी सुयोग साम्राज्य नावाने पुणे नाशिक महामार्गालगत नारायणगाव येथे इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. सदर इमारतीचे 90 टक्के काम पुर्ण झालेले आहे. आर्शिवाद इन्फास्ट्रक्चरचे भागीदार श्री.इंद्रभान विठठल गायकवाड यांचे नावाने अशंत: पुर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळणेकरीता मा. उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव या कार्यालयात दिंनाक 01/12/2025 रोजी अर्ज दाखल केला होता. व सदर अर्जाचा पाठपुरावा मी स्वत: करीत आहे. त्याकरीता मी खुप वेळा नमुद कार्यालयात पाठपुरावा केला होता. दिंनाक 20/03/2026 रोजी मी सदर अर्जाची चौकशी करण्यासाठी नमुद कार्यालयात गेलो असता तेथील उपविभागीय अधिकारी श्री.गोविंद पंढरीनाथ शिंदे यांनी मला नमुद प्रमाणपत्र देणेसाठी पाच लाख रुपयांची मागणी केली. यापुर्वीही मी गोविंद शिंदे यांना दोन वेळेस पैसे दिले होते. तरीही माझे काम करण्यासाठी त्यांनी आणखी पैश्याची मागणी केली म्हणुन मी आज रोजी तक्रार देणेसाठी आलो असुन मी श्री.गोविंद शिंदे उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचेविरुध्द लेखी तक्रार दिलेली असुन त्यांचेवर कायदेशिर कारवाई होणेस विंनती आहे. सदरची तक्रार तक्रारदार सचिन शेलोत यांनी त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिलेली असुन त्या तक्रारीवर पंच क्रं 1 म्हणुन श्री. अमोल अंदुरे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. यशपाल कांबळे यांनी व आम्ही समक्ष म्हणुन सही केली आहे.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीवरुन तात्काळ पुढील कारवाई करणेचे ठरविण्यात आले, त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक कारवाईकामी आवश्यक असणारे साहीत्य घेऊन शासकीय वाहनाने व तक्रारदार श्री शेलोत हे त्यांचेकडील वाहनाने, अँन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालय येथून रवाना होवुन विश्रातवाडी – आळंदि – चाकण चौकातुन डावीकडे वळुन चाकण – खेड मार्गे नाशिक-पुणे महामार्गावरील मोक्ष हॉटेलसमोरील पार्कीगमध्ये 17.05 वा. चे सुमारास पोहोचलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक गोविंद शिंदे हे त्यांचे कार्यालयात उपस्थित

आहेत अगर कसे याबाबत खात्री करण्यास सांगीतली असता, तक्रारदार श्री शेलोत यांनी, लोकसेवक शिंदे हे त्यांचे कार्यालयात नसल्याचे सांगीतले. त्यामुळे पुढील कारवाई हि दि. 25/03/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले होते.

आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि. 25/03/2026 रोजी पंच व पथक लाप्रवि, पुणे कार्यालयामध्ये सकाळी 07.00 वा. हजर झाले. त्यानंतर आम्ही पंचांना सांगीतले की, तक्रारदार यांनी दिनाक 24/03/2026 चे 20.00 वा. चे सुमारास मला फोनवरुन सांगीतले की, तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्रं. 9890151935 यावरुन गोविंद शिंदे, प्रांत अधिकारी यांचा मो.क्रं. 9423116611 यावर फोन केला असता, त्यांना उदया दि. 25/03/2026 रोजी सकाळी 10.30 वा. चे सुमारास बोलाविले असलेबाबत सांगीतले." त्यानंतर दिंनाक 25/03/2026 रोजी आम्ही सर्वजण शासकीय वाहनतुन सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य घेवून अॅन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालय येथून रवाना होवुन नाशिक-पुणे महामार्गावरील मोक्ष हॉटेलसमोरील पार्कींगमध्ये 09.05 वा. चे सुमारास पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहनाने उपस्थित होते. त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुशंगाने पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. सदर पडताळणी कारवाई वेळी शासकीय व्हाईसरेकॉर्डरमध्ये तक्रारदार व आलोसे यांचे संभाषण रेकॉर्ड होणार असल्याचे सांगुन त्यामध्ये एक सिंलबद मायक्रो एस.डी.कार्ड सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे sanDisk SD HC I 32GB 5334XV2416LQ BM MADE IN CHINAअशा वर्णनाचे मेमरीकार्ड टाकुन तक्रारदार व दोन्ही पंच यांचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 09.34 वा. ध्वनीमुद्रीत केले. सदरवेळी एक नविन सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी चे सिंलबद मायक्रो एस.डी.कार्ड SanDisk Ultra 32GB Micro SD HC I मागील बाजुस 5481DXACXOEM BM MADE IN CHINAअशा वर्णनाचे मेमरीकार्ड शासकिय कॅमेरामध्ये टाकुन नमुद निवेदणाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन देऊन पडताळणी कारवाई करीता लोकसेवक गोविंद शिंदे यांची भेट घेणेकामी उपविभागीय अधिकारी कार्यालय, जुन्नर-आंबेगाव, उपविभाग मंचर,(पुणे) येथे पंच क्रं 1 अंदुरे यांचेसह तक्रारदार यांचे चारचाकी ईनोवा क्रं एमएच 12 एसटी 1112 यामधुन 10.16 वा रवाना केले काहीवेळाने तक्रारदार व पंच अंदुरे हे पथक थांबले त्याठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर 11.10 वा बंद केला. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना पडताळणी कारवाई दरम्यान झालेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, "मी व पंच अंदुरे असे उपविभागीय अधिकारी कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी उपविभागीय अधिकारी त्यांचे केबीनमध्ये उपस्थित नव्हते. त्यानंतर मी माझे मो.क्रं. 9890151935 यावरुन गोविंद शिंदे, प्रांत अधिकारी यांचा मो.क्रं. 9423116611 यावर दोन वेळा फोन केला असता, त्यांचेसोबत संपर्क होवु शकला नाही. म्हणुन मी माझ्या मोबाईलवरुन व्हॉटसअप कॉलव्दारे त्यांचेसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचेसोबत संपर्क झाला नाही. त्यानंतर मी अंशत: पुर्णत्वाच्या दाखल्याच्या अनुशंगाने केलेले अँफिडेव्हीट घेऊन खैरनार, लिपीक यांचेकडे दिले व त्यानंतर मी व पंच अंदुरे कार्यालयातुन बाहेर निघुन माझ्या चारचाकी वाहनाने आपण थांबलो त्याठिकाणी परत आलो." अशी हकिकत पंचासमक्ष सांगीतली. त्याचवेळी तक्रारदार शेलोत यांनी आम्हाला सांगीतले की, लोकसेवक गोविंद शिंदे यांचा व्हॉटसअॅपवर मिस कॉल आलेला आहे. त्यावेळी आम्ही लोकसेवक गोविंद शिंदे, उपविभागीय अधिकारी, मंचर यांचेकडे फोनवरुन पडताळणी कारवाई करण्याचे ठरवुन पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने पंच व तक्रारदार शेलोत यांना सुचना दिल्या. तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांना त्यांचे वरील नमुद मोबाईलवर क्रमांकावर व्हॉटसअॅपव्दारे 11.21 वा. संपर्क केला असता लोकसेवक गोविंद शिंदे यांनी दिंनाक 27/03/2026 रोजी कार्यालयात भेटण्यास सांगीतले. सदरचा कॉल हा शासकीय रेकॉर्ड करण्यात आलेला आहे. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

आम्ही दिलेल्या पुर्व सुचनेप्रमाणे दि. 27/03/2026 रोजी सकाळी 07.00 वा. लाप्रवि, पुणे कार्यालयातुन पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे सर्व साहीत्य घेवुन नाशिक-पुणे महामार्गावरील मोक्ष हॉटेलसमोरील पार्कीगमध्ये 08.50 वा. चे सुमारास पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे उपस्थीत होते. आजपर्यंत झालेल्या कारवाईची उजळणी करुन पुढील पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्ही पंचासमक्ष सांगीतले की, "दिंनाक 26/03/2026 रोजी मी व माझा मित्र अभिषेक भुजबळ असे दुपारी तिन वाजेच्या सुमारास भेटलो असता मी अभिषेक यांना अॅॅफीडेव्हीट उपविभागीय कार्यालयात जमा केल्याचे सांगीतले. त्यावेळी अभिषेक याने माझे समक्ष लोकसेवक गोविंद शिंदे यांना व्हॉटअॅप कॉल केला असता त्यांनी उदया दिंनाक 27/03/2026 रोजी सकाळी त्यांचे कार्यालयात मला भेटण्यास सांगीतले असुन येतांना "दोन लाख घेवुन या" असे लोकसेवक शिंदे यांनी सांगीतले असल्याचे सांगीतले. त्यानंतर पडताळणी कारवाई करीता तक्रारदार व पंच यांचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 09.25 वा. ध्वनीमुद्रीत केले

नमुद निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर योग्य त्या सुचना देवुन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन देऊन पडताळणी कारवाई करीता पंच क्रं 1 यांचे सोबत लोकसेवक शिंदे यांची भेट घेणेकामी उपविभागीय अधिकारी कार्यालय, जुन्नर-आंबेगाव, उपविभाग मंचर,(पुणे) येथे तक्रारदार यांचेचारचाकी ईनोवा क्रं एमएच 12 एसटी 1112 यामधुन 09.52 रवाना केले. त्यानंतर तक्रारदार हे पडताळणीवरुन पंचासह परत आले त्यावेळी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ सकाळी 12.08 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, मी व पंच क्रं 01 असे दोघे लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो व लोकसेवक शिंदे यांची भेट घेतली यावर लोकसेवक यांनी “खैरनार आले नाही ते आल्यानंतर फाईल पुटअप करण्यास सांगतो” असे सांगीतले. त्यानंतर खैरनार आल्यानंतर त्यांनी माझी फाईल लोकसेवक गोविंद शिंदे यांचे समोर सही करीता ठेवली. लोकसेवक शिंदे यांनी अंशत: पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर सही केली. त्यानंतर मी व पंच लोकसेवक शिंदे यांना ईमारतीचा अंशत: पुर्णत्वाचा दाखला मिळल्याने त्यांचे केबीनमध्ये भेटण्यास गेलो. त्यावेळी मी लोकसेवक शिंदे यांना “सर कंप्लीशन मिळाल आहे आम्हाला” असे म्हणत मी त्यांना “पुढ कस काय सर” असे विचारले असता, त्यांनी मला पंचांकडे ईशारा करत “कोण आहे तुमच्यासोबत” अशी विचारणा करुन “सांगीतल ना अभिषेकला” असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना “अभिषेक मला काल बोलला होता, त्याचा फोन आलता ना मला” असे म्हणालो त्यावर ते मला “हं..” असे म्हणाले. त्यावर मी त्यांना “तर तो म्हणाला दोन-तिन लाख रुपये दयावे लागतील” असे म्हणालो. त्यावर ते मला “हां...” असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना “सांगा मग कस काय करु?”असे विचारले.त्यावर लोकसेवक शिंदे मला “या घेऊन, आल तरी चालेल, आहे मी ईथच ए” असे म्हणाले. त्यावर मी त्यांना “दुपारी येऊ” असे बोललो असता लोकसेवक शिंदे मला “हं...” असे म्हणाले त्यावर मी त्यांना “किती आणु” अशी विचारणा केली तेंव्हा ते मला “दोन-एक आणा” असे म्हणाले असता मी त्यांना “दोन लाख” असे बोललो तेंव्हा लोकसेवक शिंदे मला “हां...” असे म्हणाले. त्यावर मी त्यांना “ठिक ए एक दोन तासांनी” असे बोललो.तेंव्हा ते मला “या” असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना “ओके” असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच अंदुरे लोकसेवक शिंदे यांचे केबीनमधुन बाहेर निघुन माझ्या वाहनाने पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. अशी हकिकत आम्हा पंचासमक्ष सांगीतली. एकंदरीत तक्रारदार यांचे तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई वरुन लोकसेवक गोविंद शिंदे, उपविभागीय अधिकारी, मंचर यांनी तक्रारदार सचिन शेलोत यांचेकडे ईमारतीचा अंशत: पुर्णत्वाचा दाखला दिला. व सदरचा अंशत: पुर्णत्वाचा दाखला देण्याच्या मोबदल्यात पंचासमक्ष दोन लाख रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम घेऊन येणेबाबत सांगीतले असल्याचे निष्पन्न झाल्याने आम्ही तात्काळ सापळा कारवाई करण्याचा निणय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये 13.50 वा. रेकॉर्ड केले, सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे व्यवसायामधील दोन लाख रुपये रक्कम हजर केली. सदर लाच रक्कमेच्या चलनी नोटांचे नंबर एका को--या कागदावर लिहून घेतले. तक्रारदार व दोन्ही पंच यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर नोटांच्या दोन्ही बाजुस, लिफाफयास लावुन सदरचा लिफाफा व पिशवीस कापसाच्या बोळयाने क्रमा-क्रमाने अँथ्रासिन पावडर लावली. सदरची पिशवी तक्रारदार यांच्या हातामध्ये दिली. तक्रारदार व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुशंगाने योग्य त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावुन देवुन. पंच क्र.1 अंदुरे यांचेसह तक्रारदार यांचे वाहनातुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंचर कार्यालयात 14.31 वा रवाना केले त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकीय वाहनामधुन रवाना झाले. कार्यालयाजवळ पोहचल्यानंतर सापळा पथक हे कोणासही शंका येणार नाही याप्रकारे सापळा लावुन थांबले. काही वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत नियोजीत ईशारा केला. त्यावेळी तात्काळ सदर ठिकाणी पोहोचुन तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर 15.03 वा बंद केला. तक्रारदार यांना आम्ही लाच रक्कम कोणी स्विकारली अशी विचारणा केली असता, तक्रारदार यांनी उपविभागीय अधिकारी या केबीनमध्ये बसलेल्या इसमाकडे इशारा करत ते लोकसेवक गोविंद शिंदे असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली असल्याचे सांगीतले. त्यावेळी लगेच लोकसेवक शिंदे यांना ताब्यात घेवुन लाच रकमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे उजव्या हाताने त्यांच्या टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली लाच रक्कम काढुन पथकासमक्ष धरली. त्यावेळी पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन पंच क्रं 2 कांबळे यांनी सदरच्या लाच रक्कमेचे पाकिट ताब्यात घेतले. त्यानंतर आलोसे श्री. शिंदे यांचे ताब्यातील नोटांचे नंबर हे सापळापुर्व कार्यवाही दरम्यान आमच्या ताब्यात असलेल्या नोटांचे नंबर लिहलेला कागदावरील नंबर व आलोसे शिंदे यांचेकडून हस्तगत केलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर हे एकच आहेत किंवा कसे? याची खात्री करण्याकरीता आम्ही सांगितले असता, पंच क्र.02 श्री. कांबळे यांनी सदर हस्तगत नोटांचे नंबर व सापळापुर्व पंचनाम्या दरम्यान कागदावरील लिहलेले नोटांचे

त्यानंतर आलोसे यांचे कार्यालयामध्ये कृत्रीम
नंबर यांची तपासणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर आलोसे यांचे कार्यालयामध्ये कृत्रीम
अंधार करुन अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता लोकसेवक शिंदे यांच्या उजव्या हातास
अँथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली तशीच चकाकी, लाच रक्कम ठेवलेल्या ड्रॉवरमधील कागदावर
तसेच तक्रारदार व पंच क्र 02 श्री यशपाल काबळे याचे हातास दिसुन आली. तसेच लोकसेवक शिंदे यांचेकडुन जप्त
करण्यात आलेल्या लाच रकमेस तशीच चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर ठिकाणी पुन्हा उजेड करण्यात आला.
त्यावेळी आम्ही लोकसेवक शिंदे याना त्याचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.गोविंद पंढरीनाथ शिंदे,
वय - 46 वर्षे, पद - उपविभागीय अधिकारी, नेम. जुन्नर -आंबेगाव उपविभाग, मंचर, जि. पुणे रा.कुबेर पॅलेस, फलॅट
नं 403, बेंडे मळा, मंचर, जि. पुणे असे सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक शिंदे यांना तक्रारदार यांचे कामाच्या
अनुशंगाने कागदपत्रांची विचारणा केली असता, सदरचे कागदपत्रे हे लिपीक खैरनार यांचे ताब्यात असल्याचे
सांगीतल्याने आम्ही तात्काळ दोन्ही पंचासमक्ष सदरची फाईल ताब्यात घेतली. त्यानंतर पुढील कारवाई हि मंचर
पोलीस स्टेशन येथे जावुन करण्याचे ठरविल्याने लोकसेवक शिंदे याना ताब्यात घेऊन संपुर्ण पथक व पंच शासकीय
वाहनाने मंचर पोलीस स्टेशन येथे आले. त्यावेळी आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान
घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता त्यानी दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की ,आम्ही कार्यालयात गेल्यानतर
गर्दी होती त्यानतर गर्दी कमी झाल्याने मी व पंच अदुरे त्याचे केबीनमध्ये जात असताना त्यांचे कार्यालयीन शिपाई
यानी मला एकट्याला केबीनमध्ये जावु दिले. त्यामुळे मी एकटाच केबीनमध्ये गेलो. त्यावेळी मी लोकसेवक शिंदे यांना
"बरं झाल, आज कंप्लिशन दिल, हे दोन लाख रुपयेत" असे म्हणत लाच रक्कम त्यांचेसमक्ष धरली. त्यावेळी
लोकसेवक शिंदे यानी नमुद लाच रकमेची पिशवी त्यांचे उजव्या हाताने घेऊन "राहु दया, राहु दया, राहु दया,
ठिकव्य" असे म्हणाले. त्यावर मी त्याना "ओके सर" असे म्हणालो. त्यानंतर मी त्यांना "ऐका ती पिशवी देऊन
टाका मला" असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक शिंदे यानी पिशवीमधील लाच रकमेचे पाकिट त्यांच्या उजव्या हाताने
काढुन त्याच्या टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवले व मला पिशवी परत दिली. अशी हकिकत दोन्ही पंचासमक्ष सांगीतली.
त्यानंतर आम्ही सापळा कारवाई दरम्यानचे व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट  फॉरवर्ड करुन ऐकले
असता त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र 01 यानी सांगीतलेप्रमाणे हकिकत मिळुन आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा
करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार सचिन शेलोत यानी दिंनाक 24/03/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन दिंनाक 27/03/2026
रोजीच्या उपविभागीय अधिकारी, नेम. जुन्नर -आंबेगाव उपविभाग, मंचर, जि. पुणे येथे करण्यात आलेल्या
पडताळणी कारवाईमध्ये आरोपी लोकसेवक श्री. गोविंद पंढरीनाथ शिंदे, वय - 46 वर्षे, पद - उपविभागीय
अधिकारी, नेम. जुन्नर -आंबेगाव उपविभाग, मंचर, जि. पुणे रा.कुबेर पॅलेस, फलॅट नं 403, बेंडे मळा, मंचर, जि.
पुणे यानी तक्रारदार याचेकडे त्याचे आर्शिवाद ईन्फ्रास्ट्रक्चर या फर्मच्या सुयोग साम्राज्य या ईमारतीच्या अंशत:
पुर्णत्वाचा दाखला दिल्याचा मोबदला म्हणुन 02 लाख रुपयाची पंचासमक्ष लाच मागणी करुन सापळा कारवाई
दरम्यान लोकसेवक गोविंद शिंदे यानी उपविभागीय अधिकारी, जुन्नर -आंबेगाव उपविभाग, मंचर, जि. पुणे या
कार्यालयात 02 लाख रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्याना दि. 27/03/2026 रोजी दुपारी 15.03 वा. चे
सुमारास रंगेहात पकडण्यात आलेले आहे. म्हणुन माझी श्री. गोविंद पंढरीनाथ शिंदे, वय - 46 वर्षे, पद -
उपविभागीय अधिकारी, नेम. जुन्नर -आंबेगाव उपविभाग, मंचर, जि. पुणे रा.कुबेर पॅलेस, फलॅट नं 403, बेंडे मळा,
मंचर, जि. पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन
बरोबर आहे.

**13. Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
SHREEKANT CHANDRAKANT KANKAL(I (Inspector)) / POBN77722 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

HC1992
ठाणे अंमलदार
मंदर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SHREEKANT CHAND
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN77722

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**